धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई यांचे कार्यालय,.

# प रि प त्र क क्र मां क :- ३४०, दि.२१/६/२००८

विषयः- धर्मादाय संघटनेतील निरिक्षकांकडे प्रलंबीत
असलेल्या चौकशी प्रकरणाबाबत.

असे निदर्शनास आले आहे की, विभागीय कार्यालयातील निरिक्षकांकडे बहुतांशी चौकशी प्रकरणे प्रदीर्घ काळ प्रलंबित असल्याचे दिसून येते. याशिवाय सन १९९५ पूर्वीची प्रकरणे निकाली काढण्याकरीता वारंवार संबधितांनी तोंडी सुचना देऊनही विभागीय कार्यालयाचे निरिक्षकांनी जुनी प्रकरणे निकाली काढलेली नाहीत असेही आढळून आले आहे.

यापुढे सर्व कार्यालयातील निरिक्षकांना असे सुचीत करण्यात येते की, त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये दर पंधरा दिवसांनी त्या-त्या प्रकरणांच्या स्थितीचा अहवाल संबंधीत अधिकाऱ्यांकडे न चुकता करावा.

तसेच असेही सुचीत करण्यात येते की, वरील नमुद केलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी सर्व संबंधीतांची राहील. जे निरिक्षक या सुचनांचे पालन करणार नाहीत, त्या निरिक्षकांच्या कामकाजाचा अहवाल सहायक धर्मादाय आयुक्त/धर्मादाय उप आयुक्त/धर्मादाय सह आयुक्त यांनी तात्काळ

मुख्यालयास सादर करावा. जेणेकरुन सुचनांचे पालन न करणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करता येईल.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.